# सायबर सेल, पिंपरी चिंचवड

**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,**
**प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे**

| प्रेसनोट | पिंपरी चिंचवड | दिनांक - २७/०८/२०२४ |
|---|---|---|

## शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे बहाण्याने ऑनलाईन ५०,७०,०००/- रुपयांची फसवणुक करणारे आरोपीस सायबर सेलकडुन दौंड, श्रीगोंदा येथुन ताब्यात घेवुन गुन्हा उघड

दिघी येथे राहणारे तक्रारदार यांचे फेसबुकवर आरोपी यांनी टीआरपीएच कंपनीची जाहीरात पाठवुन त्यांना लिंकद्वारे व्हॉट्सअप ग्रुपवर जॉईन केले व त्यांचे कंपनीचे टीआरपीएच ॲपवरुन तसेच त्यांचे सल्ल्याप्रमाणे शेअर्स टेड्रींग केल्यास चांगला लाभ मिळवुन देण्याचे अमीष दाखवुन तक्रारदार यांचा विश्वास संपादन करुन वेगवेगळे शेअर ट्रेडींगच्या नावाने वेगवेगळया बँक अकाऊंटवर एकुण ५०,७०,०००/- रु. भरण्यास भाग पाडुन फसवणुक केल्याने तक्रारदार यांनी प्रथम ऑनलाईन तक्रार केली व त्यानंतर दिघी पोलीस ठाण्यास सदरबाबत तक्रार दिल्याने दिघी पो.स्टे. गु.रजि.नं. ३४७/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ (सी) ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा वरिष्ठांचे आदेशाने सायबर सेलकडुन समांतर तपास चालु असताना आरोपी याने गुन्हा करण्यासाठी वेगवेगळया बँक अकाऊंटचा वापर केला असल्याने सदर बँक अकाऊंटची माहीती घेतली असता त्यामधील कोटक बँक अकाऊंट नं. ९७४९३८४२३५ चेधारक हा दौंड, श्रीगोंदा, अहमदनगर येथील असल्याची खात्रीशीर तांत्रिक माहीती प्राप्त झाली. त्यांचा शोध घेवुन तपास करणे आवश्यक असल्याने पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. संदीप डोईफोडे व सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री. डॉ. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली व परवानगीने पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सहा. पोलीस निरीक्षक, प्रविण स्वामी यांनी सायबर सेलकडील पोलीस अंमलदार हेमंत खरात, श्रीकांत कबुले, सुरज जाधव असे पथक मिळालेल्या तांत्रिक माहीतीवरुन दौंड, श्रीगोंदा, अहमदनगर येथे पाठविले असता सदर पथकाने संशयीत बँक अकाऊंट धारक १) अमर त्र्यंबक फराटे वय ३८ वर्षे, रा.फराटे गल्ली स्टेट बँक परिसर दौंड जि. पुणे, २) संतोष रामदास पाचपुते वय ३५ वर्षे रा.काष्टी गजानन वाडी ता.श्रिगोंदा जि.अहमदनगर यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन सायबर सेल येथे हजर केले. त्यावेळी त्यांचेकडे कौशल्यपुर्वक तपास करता त्यांनी सदरचा गुन्हा त्याचे साथीदार नामे शैलेश ऊर्फ शेलेंद्र दत्तात्रय क्षीरसागर रा. लहाटेपटवस्ती श्रीरसागर मळा,काष्टी ता.श्रिगोंदा जि. अहमदनगर याचेशी संगनमत करुन केला असल्याची कबुली दिली, त्याप्रमाणे त्याची तांत्रिक व इतर माहीतीचे आधारे पोउनि. सागर पोमण, अंमलदार अनिकेत टेमगिरे, सुरंजन चव्हाण यांनी तात्काळ त्याचा मांजरी, पुणे भागात शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करता सदर अकाऊंटधारक साथीदारांसोबत मिळुन सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. तसेच त्यांचे आणखी दोन साथीदार असल्याची माहीती दिली आहे. त्यानंतर ताब्यातील नमुद अकाऊंटधारक १) अमर त्र्यंबक फराटे वय ३८ वर्षे, रा.फराटे गल्ली स्टेट बँक परिसर दौंड जि. पुणे, २) संतोष रामदास पाचपुते वय ३५ वर्षे धंदा - व्यवसाय रा.काष्टी गजानन वाडी ता.श्रिगोंदा जि.अहमदनगर व त्यांचा साथीदार ३) शैलेश ऊर्फ शेलेंद्र दत्तात्रय क्षीरसागर वय ३७ वर्षे, रा.योगेश गव्हाणे यांची बिल्डींग,गोपाळवाडी माजरी बुाा ता.हवेली जि.पुणे मुळ पत्ता -लहाटेपटवस्ती श्रीरसागर मळा,काष्टी ता.श्रिगोंदा जि.अहमदनगर यांचा गुन्हयात सक्रिय सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे. त्यानंतर आरोपींची पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आली असुन त्यांचे इतर साथीदार, फसवणुकीचे रक्कमेबाबतचा तपास चालु आहे. आरोपी यांनी गुन्हा करण्यासाठी वापरलेले नमुद बँक अकाऊंटवर एकुण ३८ पोर्टलच्या तक्रारी व त्यामध्ये ४ कोटी रुपयांपेक्षा जास्त व्यवहार झाल्याचे आढळुन आले आहे, त्याअनुषंगाने तपास चालु असुन सबंधीतांना त्याबाबत माहीती देण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड - श्री.विनयकुमार चौबे, मा. सह पोलीस आयुक्त- श्री. डॉ. शशिकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त- श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे - श्री. संदिप डोईफोडे, मा. सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १ - श्री. डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. रविकिरण नाळे, सपोनि. प्रविण स्वामी, पोउपनि सागर पोमण, पोलीस अंमलदार हेमंत खरात, श्रीकांत कबुले, अनिकेत टेमगिरे, सुरज जाधव, सुरंजन चव्हाण, अतुल लोखंडे, दिपक भोसले, नितेश बिचेवार सर्व नेमणुक सायबर सेल यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड.